| | |
|---|---|
| CNR No. MHSO07-000041-2026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०/२०२६**<br>(चंदाताई जगदीश त्रिवाडी ऊर्फ तिवाडी वि. गावकामगार तलाठी इसबावी) |

## निशाणी क्र. ०१ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन VIII ॲक्ट १८२७ चे कलम २ व ४ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल करण्यात आला.

२. अर्जदार नं.१ ते ३ यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार हे मयत जयनारायण यांच्या मुली असून मयत जयनारायण यांना सुरेश व शामसुंदर अशी दोन अपत्ये होती. यातील सुरेश हे दिनांक २८/०५/२०२१ रोजी वुध्दापकाळाने मयत झाले तर त्यांची पत्नी संगीता ही सुरेश यांचेपूर्वीच म्हणजेच दिनांक ०३/०२/२०१५ रोजी मयत झाल्या आहेत. अर्जदार नं.१ ते ३ हे सुरेश यांच्या सख्ख्या बहिणी असून यातील मयत सुरेश व संगीता हे विनाअपत्य मयत झालेले आहेत. त्यांना अर्जदार नं.१ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारस असून त्यांचेशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाही. मयत सुरेश व संगिता यांचे नावे मौजे इसबावी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे गट नंबर ४७/२/३८ ही मिळकत असून त्यांचे पश्चात नियमाप्रमाणे अर्जदारांस मिळणे न्यायाच्या दृष्टीने जरुर तो वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार नं.१ ते ३ यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

३. प्रस्तुत अर्जाच्या पुष्टयर्थ अर्जदार यांनी नि.क्र.४ कडील कागदपत्रांच्या यादीसह मयत सुरेश जयनारायण जोशी व संगीता सुरेश जोशी यांचे मृत्यूप्रमाणपत्राची प्रमाणित प्रत तसेच मौजे इसबावी येथील गट नं.४७/२/३८ चा ७/१२ उतारा इ. कागदपत्रे दाखल केली आहेत. याशिवाय दिनांक २४/०१/२०२६ रोजीचे निशाणी क्र.०६ कडील दैनिक 'पुढारी' या वृत्तपत्रातील जाहीर प्रगटनाची प्रत सुध्दा सादर करण्यात आली आहे. तसेच नि.क्र. ०७ कडे जाहीरनामा सादर करण्यात आला. अर्जदार यांनी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. ८ कडे दाखल केलेले आहे. तसेच नि.क्र. ११ कडे अर्जदारातर्फे आणखी जादा तोंडी पुरावा देणेचा नाही अशी पुरसीस दाखल केलेली आहे.

४. उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मयत सुरेश जयनारायण जोशी हे दिनांक २८/०५/२०२१ रोजी मयत झाले. तसेच त्यांची पत्नी संगीता सुरेश जोशी ही दिनांक ०३/०२/२०१५ रोजी मयत झाले आहेत. तसेच ते विनाअपत्य मयत झाले आहेत असे कथन शपथेवर अर्जदारांनी केलेले आहे. तसेच अर्जामध्ये नमुद गट

क्र.४७/२/३८ हा जयनारायण म्हणजेच सुरेश यांचे वडिल यांचेकडून सुरेश व संगीता यांना मिळाल्याचे कथन अर्जदारांनी शपथेवर केलेले आहे. त्यामुळे संगीताच्या पतीचे वारस या नात्याने अर्जदार या मयत संगीता हिच्या वारस असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे केवळ पती व सासरे यांच्याकडून आलेल्या मिळकतींबाबतच सदरचे वारस प्रमाणपत्र देण्यात येत आहे. त्यामुळे अर्जदार हेच मयत सुरेश जयनारायण जोशी आणि संगीता सुरेश जोशी यांचे कायदेशीर वारस आहेत असे मत मी नोंदवित आहे. सदर कामी गावकामगार तलाठी इसबावी यांना सामनेवाला करण्यात आले असले तरी अर्जदाराच्या वकिलांनी त्यांना त्यांच्याविरूध्द काही मागणी नसल्याने नोटीस काढण्यात येऊ नये असे पुरसीस दाखल केलेली आहे. त्यामुळे त्यांना नोटीस काढण्यात आलेली नाही. याशिवाय दिनांक २४/०१/२०२६ रोजी दैनिक 'पुढारी' या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन प्रसिध्द होऊन व जाहिरनामा प्रसिध्द करुन सुध्दा उपलब्ध कालावधीमध्ये कोणीही आक्षेप नोंदवला नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार नं.१ चंदाताई जगदीश त्रिवाडी ऊर्फ तिवाडी, अर्जदार नं.२ मिना ऊर्फ मिनाक्षी घनश्याम जोशी आणि अर्जदार नं.३ दुर्गा व्यंकट ऊर्फ व्यंकटेश जोशी हे मयत सुरेश जयनारायण जोशी व संगीता सुरेश जोशी यांचे कायदेशीर वारस आहेत असे प्रमाणपत्र अर्जदार यांचेकडून योग्य ती कोर्ट फी भरुन घेऊन देण्यात यावे.

३. सदर प्रमाणपत्र स्वतः कोणत्याही मालमत्तेत कोणतेही हक्क किंवा शीर्षक निर्माण करीत नाही.

(न्यायासनावर निवेदीत आणि अधीघोषीत)

ANIL SAHEBRAO SONWALKAR
Digitally signed by ANIL SAHEBRAO SONWALKAR
Date: 2026.05.16 16:05:50 +0530

( ए. एस. सोनवलकर )
४थे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर,
पंढरपूर.

दिनांकः–१६/०५/२०२६.

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Smt.S.A.Lagale |
| Court | :- | 4th Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Pandharpur |
| Date | :- | 16.05.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 16.05.2026 |
| Judgment/Order uploaded on | :- | 16.05.2026 |